महाराष्ट्र शासन

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

https://admission.dvet.gov.in ; www.dvet.gov.in ; itiadmission@dvet.gov.in

## शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑगस्ट २०२४ सत्रासाठी प्रवेश सूचना

## ITI Admission Portal: https://admission.dvet.gov.in

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत (Craftsman Training Scheme) ऑगस्ट २०२४ सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया (Centralized Online Admission Process) पध्दतीने करण्यांत येत असून प्रवेशाची सविस्तर "माहितीपुस्तिका - प्रवेश पध्दती, नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती दि. ०३ जून, २०२४ पासून प्रवेश संकेत स्थळावर Download Section मध्ये Pdf स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या पुरवणी परीक्षेच्या निकालानुसार नव्याने उत्तीर्ण झालेले उमेदवार तसेच विहित मुदतीत प्रवेश अर्ज सादर करु न शकलेल्या उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी खालील प्रमाणे पुरवणी वेळापत्रक घोषित करण्यात येत आहे.

-: प्रवेशाचे पुरवणी वेळापत्रक :-

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीयेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| **१.०** | **नव्याने ऑन लाईन प्रवेश अर्ज करणे व प्रवेश अर्ज निश्चित करणे :** | | |
| १.१ | विहित मुदतीत प्रवेश अर्ज सादर करु न शकलेल्या उमेदवारांना समुपदेशन फेरीत संधी उपलब्ध करुन देण्यासाठी ऑन लाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरुस्ती (Edit) करणे व प्रवेश अर्ज शुल्क भरणे | ०४ सप्टेंबर, २०२४ स.९.०० वाजेपासून | १७ सप्टेंबर, २०२ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **२.०** | **संस्थास्तरीय समुपदेशन फेरी** | | |
| २.१ | सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थातील रिक्त जागा संस्थास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे भरण्यासाठी उपलब्ध राहतील. सदर प्रवेश फेरीकरीता उपलब्ध जागांचा तपशिल संकेतस्थळावर प्रकाशित करणे | दिनांक १७ सप्टेंबर,२०२४ सायं. ५.०० वाजता | |
| २.२ | समुपदेशन फेरीसाठी पात्र उमेदवार व नव्याने अर्ज भरलेल्या उमेदवारांची समुपदेशन फेरीसाठी एकत्रित गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | दिनांक १८ सप्टेंबर,२०२४ सायं.५.०० वाजता | |
| २.३ | प्रवेशोच्छुक व नोदणीकृत उमेदवारांनी संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यक्तीशः हजर राहुन समुपदेशन फेरीकरीता हजेरी नोंदवावी. | दिनांक १९ ते ३० सप्टेंबर,२०२४ दररोज स.८.०० वाजेपासून ते दु.१२.०० वाजेपर्यत | |
| २.४ | हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून संबंधित संस्थास्तरावर गुणवत्ता यादी तयार करुन प्रकाशित करणे. | दिनांक १९ ते ३० सप्टेंबर,२०२४ दररोज दु.१.०० वाजेपासून ते सायं. ५.०० वाजेपर्यत | |
| २.५ | संस्थास्तरावर तयार केलेल्या गुणवत्ता यादी नुसार उमेदवारांना समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल. | दिनांक १९ ते ३० सप्टेंबर,२०२४ दररोज दु.१.०० वाजेपासून ते सायं. ५.०० वाजेपर्यत | |
| २.६ | सदर प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर संबंधित संस्थेत त्याच दिवशी प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करावी. उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास सदर जागा दुसऱ्या दिवशी रिका समजुन प्रवेशासाठी खुली करण्यात येईल. | दिनांक १९ ते ३० सप्टेंबर,२०२४ दररोज दु.१.०० वाजेपासून ते सायं. ५.०० वाजेपर्यत | |
| **३.०** | **खालील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था स्तरावरील प्रवेश** | | |
| ३.१ | खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क. १.४ प्रमाणे) व संस्थास्तरीय प्रवेश फेरीनंतर खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये रिक्त राहिलेल्या जागा संबंधित खाजगी औ.प्र. संस्थाना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध होतील | ०१ सप्टेंबर,२०२४ स.११.०० वाजेपासून | प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकापर्यत |
| वरील प्रवेश वेळापत्रक सूचक दर्शक असून त्यात बदल संभवतो. अद्ययावत प्रवेश वेळापत्रक प्रवेश संकेतस्थळावर व सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच नोंदणीकृत उमेदवारांना SMS व्दारे वेळोवेळी कळविण्यात येईल. संपूर्ण प्रवेश प्रक्रिये दरम्यान उमेदवारांनी वेळोवेळी प्रवेश संकेतस्थळास भेट देणे त्यांचे हिताचे राहील. | | | |

महत्वाची सुचना :-

प्रशिक्षण महासंचालनालय,नवी दिल्ली यांनी नव्याने संलग्नता प्रदान केलेल्या तुकडयांचा समावेश सद्यस्थितीत सुरु असलेल्या प्रवेश प्रक्रियेत करण्यात आलेला आहे. उमेदवारांनी औ.प्र.संस्था निहाय रिक्त जागांचा तपशिल अभ्यासावा व त्याप्रमाणे संस्थास्तरीय समुपदशेन फेरीत सहभाग घ्यावा

-Sd-

(सतिश सुर्यवशी)

संचालक

स्थळ : मुंबई

दिनांक : ०३.०९.२०२४